गोपनीय

राज्य शासनाचे मंत्री, राज्यमंत्री व अधिकारी यांच्या विदेश दौ-यासंबंधी.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक-सीडीआर-१०८३/१९१/१९/अकरा,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २६ ऑक्टोबर, १९८३.

## शासन परिपत्रक

राज्य शासनाचे मंत्री व अधिकारी यांचे विदेश दौ-याचे प्रस्ताव ब-याच मोठ्या संख्येने केंद्र शासनाकडे अनुमतीसाठी पाठविण्यात येतात. त्यांतील बरेचसे दौरे राज्यांतील विकास कार्यक्रमांच्या विशिष्ट उद्दिष्टांशी संबंधित नसून ते सर्वसाधारण अध्ययन स्वरूपाचे असतात. शिवाय परदेशात भरणा-या एखाद्या परिषदेत सहभागी होण्यासाठी जाणा-या शिष्टमंडळाचे सदस्य जातांना अथवा परत येतांना निरनिराळ्या ठिकाणांना अल्पमुदतीच्या भेटी देतात, या सर्व प्रकाराबद्दल केंद्र शासनाने चिंता व्यक्त केली आहे. शासनाचे मंत्री व वरिष्ठ अधिकारी यांच्या अनुपस्थितीमुळे राज्यातील निकडीच्या व महत्वाच्या बाबींकडे दुर्लक्ष होऊन त्यांवर विपरीत परिणाम होतो. शिवाय अशा प्रकारच्या अनुत्पादक दौ-यांवर होणारा अनावश्यक खर्च आणि त्यामुळे विदेशी चलनावर पडणारा ताण कमी करणे नितांत आवश्यक आहे. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन शासन असा आदेश देत आहे की, विदेश दौ-यांच्या सर्व प्रस्तावांची अत्यंत काटेकोरपणे छाननी करण्यात यावी. व त्यासंदर्भात केंद्र शासनाने दिलेल्या खालील सूचनांचे पालन करावे :-

१) नितांत गरज असलेल्या व टाळता येणे शक्य नसलेल्या दौ-यांबाबत विचार करावा. अशा दौ-यांच्या/ बाबतीत देखील दौ-याचा कालावधी व शिष्टमंडळाच्या सदस्यांची संख्या कमीत कमी करण्याचा निश्चित प्रयत्न करावा.

२) मंत्री आणि त्यांच्याच खात्याचे सचिव/वरिष्ठ अधिकारी एकाच वेळी, राज्यातून गैरहजर रहाणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

३) राज्यातील योजनांकरिता परकीय आर्थिक मदत मिळविण्यासाठी राज्य शासनाचे मंत्री किंवा अधिकारी यांनी विदेशी जाण्याचे टाळावे. कारण ही बाब केंद्र शासनाच्या आर्थिक व्यवहार विभागाच्या कक्षेत येते.

राज्य शासनाचे याबाबतीत पुढाकार घेतल्यास गौरव होण्याचा संभव असतो.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्र्यांचे खाजगी सचिव/सर्व राज्यमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक,
शासनाचे सर्व सचिव (पत्राने),
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई (पत्राने),
प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई (पत्राने),
प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई (पत्राने),
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
वित्त विभाग (दहा प्रती),
सामान्य प्रशासन विभाग, (कार्यासन क्रमांक १०, १२, १९, २०, २१, २८ व ३१),
इतर सर्व मंत्रालयीन विभाग.

पालव/१९८४